# हवामानावर आधारीत कृषि सल्ला (रत्नागिरी जिल्हा)

**(ग्रामीण कृषि मौसम सेवा, डॉ. बाळासाहेब सावंत कोंकण कृषि विद्यापीठ, दापोली आणि प्रादेशिक हवामान पूर्वानुमान केंद्र, मुंबई यांच्या संयुक्त विद्यमाने)**

**(०२३५८) २८२३८७**

**अंक ९६/२०१९** | **दिनांक २९/११/२०१९** | **कालावधी ५ दिवस**


| | | |
|---|---|---|
| **डॉ. प्रशांत बोडके,** | **डॉ. विजय मोरे,** | **डॉ. शितल यादव,** |
| विभाग प्रमुख, | नोडल ऑफिसर, | तांत्रिक अधिकारी |
| कृषिविदया विभाग | कृषिविदया विभाग | कृषिविदया विभाग |
| ९४२०४१३२५५ | ९४२२३७४००१ | ८३७९९०११६० |


| मागील हवामान आठवडा सारांश (दिनांक २३/११/२०१९ ते २९/११/२०१९) | | | | | | | हवामानाचे घटक | हवामान पूर्वानुमान (दिनांक ३०/११/२०१९ सकाळी ८:३० पासून ०४/१२/२०१९ सकाळी ८:३० वाजेपर्यंत) | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| २३/११ | २४/११ | २५/११ | २६/११ | २७/११ | २८/११ | २९/११ | | ३०/११ | ०१/१२ | ०२/१२ | ०३/१२ | ०४/१२ |
| ०.० | ०.० | ०.० | ०.० | ०.० | ०.० | ०.० | पाऊस (मिमी) | ० | ० | ० | ९ | ० |
| ३३.० | ३३.२ | ३२.५ | ३२.८ | ३४.० | ३२.८ | ३३.५ | कमाल तापमान (अं.से) | ३५ | ३५ | ३४ | ३४ | ३२ |
| १८.५ | १८.० | १८.५ | १७.० | १७.० | १७.० | २०.५ | किमान तापमान (अं.से) | २३ | २३ | २४ | २३ | २२ |
| ० | ० | ० | ० | ० | ० | २ | मेघाच्छादन (ऑक्टा) | ७ | ७ | ८ | ७ | ७ |
| ९६ | ९४ | ९६ | ९२ | ९३ | ९१ | ९३ | सकाळची सापेक्ष आर्द्रता | ७६ | ७५ | ७६ | ८२ | ७६ |
| ५६ | ६० | ४९ | ४४ | ४७ | ४७ | - | दुपारची सापेक्ष आर्द्रता | ५० | ४८ | ४९ | ५२ | ४९ |
| १.९ | २.५ | २.४ | २.४ | २.३ | २.२ | १.९ | वाऱ्याचा वेग (किमी/तास) | ६ | ७ | ७ | ६ | ७ |
| शांत | शांत | शांत | शांत | शांत | शांत | शांत | वाऱ्याची दिशा | ई.पू. | पू. | ई.पू. | पू. | पू. |

| पाऊस (मिमी) मागील आठवडयातील | पाऊस (मिमी) १/१/२०१९ पासून आजपर्यंत | पाऊस (मिमी) गेल्या वर्षीचा |
|---|---|---|
| ०.० | ५१३०.९ | ३०७१.८ |

## हवामान पूर्वानुमान कृषि सल्ला

**दिनांक ३ डिसेंबर रोजी तुरळक ठिकाणी हलक्या स्वरुपाच्या पाउसाची शक्यता असून दिनांक ३० नोव्हेंबर ते ४ डिसेंबर, २०१९ दरम्यान तापमानात वाढ संभवत असून ढगाळ वातावरण राहील.**

**दिनांक २९ नोव्हेंबर ते १ डिसेंबर, २०१९ साठी कोंकण विभागासाठी पर्जन्यमानाचा विस्तारित श्रेणी अंदाज हा सामान्यपेक्षा जास्त राहील. सामान्य फरक वनस्पती निर्देशांक (NDVI) नुसार रत्नागिरी जिल्ह्यामध्ये वनस्पती निर्देशांक चांगल्या स्वरूपाचा असून प्रमाणित पर्जन्यमान निर्देशांक (SPI) नुसार सौम्य ओलावा स्थिती दर्शविण्यात आली आहे.**

| पिक | अवस्था | कृषि सल्ला |
|---|---|---|
| **आंबा** | **पालवी ते मोहोर अवस्था** | • पुढील पाचही दिवस ढगाळ वातावरण राहण्याची शक्यता असल्याने पालवी अवस्थेत असलेल्या आंबा पिकावर तुडतुड्यांचा तसेच करपा रोगाचा प्रादुर्भाव होण्याची शक्यता असल्याने नियंत्रणासाठी डेल्टामेथ्रीन २.८% प्रवाही १० मि.ली. अधिक संयुक्त बुरशीनाशक (कार्बेन्डॅझिम १२% + मन्कोझेब ६३%) १० ग्रॅम प्रति १० लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी. तसेच मोहोर अवस्थेत असलेल्या आंबा पिकावर तुडतुड्यांचा व भुरी रोगाचा प्रादुर्भाव होण्याची शक्यता असल्याने नियंत्रणासाठी डेल्टामेथ्रीन २.८% प्रवाही १० मि.ली. + हेक्झाकोनाझोल ५% प्रवाही ५ मि.ली. प्रति १० लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी. |
| **काजू** | **मोहोर** | • काजू मोहोराचे ढेकण्या व फुलकिडीपासून संरक्षण करण्यासाठी मोहोर फुटण्याच्या वेळी प्रोफेनोफॉस ५० टक्के प्रवाही १० मि.ली. प्रति १० लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी. |
| **नारळ** | **-** | • नारळावरील गेंडाभुंगा या किडीच्या नियंत्रणासाठी नारळ बागेमध्ये शेणखताच्या खड्यात अळ्यांना मारण्यासाठी दर दोन महिन्यांनी क्लोरोपायरीफॉस २० मिली प्रति १० लिटर पाण्यात मिसळून फवारावे.<br>• नारळ बागेत ८ ते १० दिवसांच्या अंतराने पाणी देण्याची व्यवस्था करावी तसेच आळ्यामध्ये ओलावा टिकविण्यासाठी नारळाच्या शेंडया पुराव्यात आणि झावळ्यांचे आच्छादन करावे. |
| **सुपारी** | **-** | • सुपारी बागेत ७ ते ८ दिवसांच्या अंतराने पाणी देण्याची व्यवस्था करावी. |
| **कलिंगड** | **वाढीची अवस्था** | • कलिंगड पिकामध्ये मर रोगाचा प्रादुर्भाव दिसून आल्यास नियंत्रणासाठी कार्बेन्डॅझिम १ ग्रॅम प्रति लिटर या प्रमाणात द्रावण तयार करावे व वेलीच्या बुंध्याजवळ भिजवण करावी. |
| **वांगी** | **वाढीची अवस्था** | • वांगी पिकावर सुत्रकृमीचा प्रादुर्भाव दिसून येण्याची शक्यता असून प्रादुर्भावामुळे पाने पिवळी होवून झाडाची वाढ खुंटते त्यामुळे झाड सुकून मुळांवर वेड्यावाकड्या गाठी दिसून येतात. सुत्रकृमीचा प्रादुर्भाव दिसून आल्यास नियंत्रणासाठी प्रथम कीडग्रस्त झाडे, पिकांची अवशेष गोळा करून जाळून नष्ट करावीत व कडूनिंब पेंड १२५ ग्रॅम प्रति रोप बुंध्याभोवती जमिनीत मिसळून द्यावी. तसेच शेतात अधूनमधून मका या सुत्रकृमी विरोधी पिकांची लागवड करावी. |
| **मिरची** | **वाढीची अवस्था** | • मिरची पिकावर फुलकिडे, कोळी व पांढरी माशी मुळे चुरडा मुरडा या रोगाचा प्रादुर्भाव दिसून येण्याची शक्यता आहे. किडी पानातील रस शोषून घेतल्याने मिरचीची पाने सुरकुतून त्यांची वाढ खुंटते. रोगाचा प्रादुर्भाव दिसून आल्यास नियंत्रणासाठी डायमेथोएट ३० टक्के प्रवाही १० मि.ली. + गंधक किंवा मन्कोझेब २० ग्रॅम प्रति १० लिटर पाण्यात मिसळून पुर्नलागवडी नंतर १० ते १५ दिवसांच्या अंतराने फवारणी करावी.<br>• मिरची पिकावर सुत्रकृमीचा प्रादुर्भाव दिसून येण्याची शक्यता असून प्रादुर्भावामुळे पाने पिवळी होवून झाडाची वाढ खुंटते त्यामुळे झाड सुकून मुळांवर वेड्यावाकड्या गाठी दिसून येतात. सुत्रकृमीचा प्रादुर्भाव दिसून आल्यास नियंत्रणासाठी प्रथम कीडग्रस्त झाडे, पिकांची अवशेष गोळा करून जाळून नष्ट करावीत व कडूनिंब पेंड १२५ ग्रॅम प्रति रोप बुंध्याभोवती जमिनीत मिसळून द्यावी. तसेच शेतात अधूनमधून मका या सुत्रकृमी विरोधी पिकांची लागवड करावी. |
| **दुभती जनावरे** | - | • जनावरांना पिण्यासाठी स्वच्छ पाणी पुरवठ्याची व्यवस्था करावी.<br>• जनावरांना पायलाग रोगावर प्रतिबंधात्मक उपाय म्हणून पशु वैद्यकिय अधिकारी सल्ल्याने सर्व जनावरांना लसीकरण करून घ्यावे. |

**सदर कृषि सल्ला पत्रिका डॉ. बाळासाहेब सावंत कोंकण कृषि विद्यापीठ, दापोली येथील ग्रामीण कृषि मौसम सेवा योजनेतील तज्ञ समितीच्या शिफारशीनुसारतयार करून प्रसारित करण्यात आली.**

**अधिक माहितीसाठी नजीकच्या कृषी विद्यापीठाचे केंद्र किंवा महाराष्ट्र शासनाचे कृषी अधिकारी यांच्याशी संपर्क करावा**